मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# राडारोड्याने उद्योगनगरी तुंबली!


## पवना, इंद्रायणीत टाकला भराव, पाणी थेट घुसले घरा-घरांत : ओढे-नाल्यांवर बांधकामांना परवानगी अंगलट, नागरिकांचे हाल

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील दोन दिवसांपासून पिंपरी-चिंचवड शहरात पावसाची तुफान बॅटिंग सुरू आहे. संततधार पावसामुळे शहरातील ओढे-नाले तुडुंब भरून वाहात आहेत. मात्र, पवना, इंद्रायणी नदीपात्रात टाकलेला भराव, राडारोडा आणि नैसर्गिक ओढे-नाल्यांवर अतिक्रमण करून दिलेल्या बांधकाम परवानगीमुळे शहरातील अनेक सोसायटीत पहिल्या मजल्यापर्यंत पाणी आले आहे.

त्याशिवाय नागरिकांच्या घरात पाणी घुसले आहे. याकडे महापालिका आयुक्तांनी कानाडोळा करून वेळीच कारवाई न केल्याने उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड तुंबल्याचे समोर आले आहे.

महापालिकेच्या जलनिस्सारण विभागाकडून रस्त्यावर व सखल भागात पाणी साठू नये म्हणून सर्व्हेक्षण करण्यात आले. यातून उघडी गटारे, स्टॉर्म वॉटर, ड्रेनेज, नैसर्गिक नाले, ओढे, रस्त्यावरील, रेल्वे मार्गावरील छोटे-मोठे सी.डी.वर्क्स, या भागाचे सर्व्हेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणामुळे शहरातील शेकडो बांधकाम व्यावसायिकांनी नैसर्गिक नाले, ओढे बुजविले असून नाल्यांवर अतिक्रमण केल्याचे निर्देशनास आलेले आहे. वाढते नागरीकरण, लोकसंख्या वाढ आणि झपाट्याने वाढलेले गृहनिर्माण प्रकल्प यामुळे ड्रेनेज लाईन कालबाह्य होऊ लागली, शहरात सांडपाणी निचरा करणारी जलनिस्सारण व्यवस्था देखील जुनी झाल्याने लिकेज होत आहे. अनेक भागात नैसर्गिक नाले पाईपलाईन टाकून बुजवले गेले आहेत. काही ठिकाणी नाल्यांवरच बांधकामे केली आहेत. त्यामुळे ड्रेनेजलाईन वारंवार तुंबणे, पावसाळ्यात पाण्याचा योग्य निचरा न होणे, लोकवस्तीत पाणी शिरणे .



### ओढे-नाले बुजवा, पूररेषेत बांधकाम

» पवना, इंद्रायणी नदीपात्रात पूररेषा शेकडो बांधकामे सुरू आहेत. अनेक भागात नदी काठावर दिवसाढवळ्या भराव, राडारोडा टाकला जात आहे. शहरात नदीकाठावर अनधिकृत बांधकामे, पत्राशेड आणि नवीन गृहप्रकल्प होत आहेत. ही बांधकामे, पत्राशेड होताना नैसर्गिक नाले, ओढे, ड्रेनेज लाईन गायब केले आहेत. महापालिका हद्दीत नैसर्गिक नाले, ओढे हे बांधकाम व्यावसायिकांनी स्थापत्य विभागाकडून 'ना हरकत' दाखले घेऊन बुजवले आहेत. त्या पाईपची साफसफाई होत नाही. नाले, ओढे बुजवताना त्या भूमिगत पाईप टाकण्यात आलेल्या आहेत. त्या पाईप कमी व्यासाच्या आहेत.

### ऐन पावसाळ्यात येतात अडचणी

» शहरातील अनेक सखल भागात पाणी साचून पूरस्थिती निर्माण झालेली आहे. पावसाळ्याअगोदर ड्रेनेज लाईन, स्ट्रॉर्म वॉटर यात माती, दगड, प्लॉस्टिक, कचरा साचून राहिला आहे का, याबाबत वेळीच साफसफाई केलेली नाही. तर नैसर्गिक नाले, ओढे हे बिल्डर व्यावसायिक कमी व्यासाच्या पाईप टाकून बुजवले आहेत. काही ठिकाणी त्यावर थेट अतिक्रमण झाले आहे. त्यामुळे सखल भागात पाणी साचून राहिले आहे. रस्ते जलमय झाले आहेत. शेकडो नागरिकांच्या घरात पाणी शिरले आहे. गटारे तुंबली, ड्रेनेज लाईन ओव्हर फ्लो होत आहेत. नाल्यांच्या भिंती पडणे, रस्त्यात खड्डे पडणे, रस्त्यात साठलेल्या पाण्यात अपघात होत आहे. वाहतुकीला अडथळा होऊन सखल भागात पाणी साठून रस्ता तो जलमय होत आहे.

### हवामान खातेही पाण्यात

» सर्व नदीवरील पूल, रस्त्यावरील पूल, रेल्वे पूल, त्यांच्या दोन्ही बाजूला पाण्याचा निचरा होणारे सर्व मार्ग मोकळे केले नाहीत. शहरातील सर्व नाले, सी.डी. वर्क हे स्वच्छ केलेले नाहीत. सर्व नाले, ओढे, स्टॉर्म वॉटर लाईन गटारे स्वच्छ केलेले नाहीत. नाल्यावरील अतिक्रमण काढले नाही. नाल्यास अडथळा ठरणारे पाईप लाईन, केबल, सर्व्हिस लाईन स्थलांतरित करून अडथळा दूर केलेला नाही.

# चित्तथरारक बचावकार्य : इंद्रायणीत अडकलेल्या गायींची अखेर सुटका!

## चऱ्होलीतील गायींची सुखरूप सुटका: राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची मोहीम, नदीपात्रातील बेटावर गायी अडकून पडल्या होत्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

दुथडी भरून वाहणारी इंद्रायणी नदी..नदीमध्ये चहू बाजूंनी वेढलेल्या भू-भागामध्ये अडकून पडलेल्या ३ गायींचा हंबरडा...अशा परिस्थितीत त्या गायींना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी तब्बल ३ तास चाललेले बचावकार्य...अंगावर शहारा आणि प्राणीमात्रांबद्दल हृदयात साठलेला कारुण्यभाव...संपुर्ण प्रकार डोळ्याची पापणी न लवता पाहणारे परिसरातील नागरिक...आणि आपत्कालीन यंत्रणेने अथक परिश्रमाने केलेली गायींची सुखरूप सुटका...हा सर्व प्रकार याची देही याची डोळा पाहणाऱ्या नागरिकांनी अनुभवला.

चऱ्होली बुद्रुक येथील इंद्रायणी धाम स्मशानभूमीच्या किनाऱ्याच्या विरूद्ध बाजूला असलेल्या नदीपात्रातील बेटावर गेल्या २ दिवसांपासून ३ गायी अडकून पडल्या होत्या. इंद्रायणी नदीची पाण्याची पातळी वाढत गेल्याने गायींच्या सुटकेबाबत सर्वजण चिंतीत होते. महापालिकेच्या आपत्कालीन यंत्रणेला याबाबत माहिती मिळाली.

पूरनियंत्रणासाठी विविध पथके दिवसभर विविध ठिकाणी मदत आणि बचावकार्यासाठी अहोरात्र काम करत होती. आपत्कालीन परिस्थिती पाहता महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाशी संपर्क साधून त्यांना शहरात पाचारण केले. शहरातील विविध ठिकाणी या दलाच्या तुकडीने मदतकार्य करत बचावकार्यात महत्वाची भूमिका बजावली. चऱ्होली येथील नदीपात्रातील बेटावर अडकलेल्या गायींची सुटका करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाने मोहीम हाती घेतली.



### सुमारे तीन तास चालले बचावकार्य

» महापालिकेचे अग्निशमन दल, पोलीस दल, आपत्कालीन परिस्थितीत काम करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक नागरिक यांनी संयुक्तपणे बचावकार्य सुरू केले. सुमारे तीन तास चाललेल्या या बचावकार्यात राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी अत्याधुनिक सुसज्ज उपकरणांसह ३ बोटी आणि दोरखंडाच्या सहाय्याने गायींना सुखरूप नदीकाठी आणले आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. अग्निशमन दलाचे दोन वाहने, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसदा दलाची ३ वाहने घटनास्थळी तैनात करण्यात आली होती.

### शहरात राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची तुकडी...

» शहरातील आपत्कालीन परिस्थितीचा आढावा घेवून करावयाच्या उपाययोजनांबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी महापालिकेच्या अग्निशमन दलासह विविध विभागांकडे असलेली उपकरणे आणि साधन सामग्री यामध्ये आणखी कोणत्या अत्याधुनिक उपकरणांची आवश्यकता असावी याबाबत उभयतांमध्ये सविस्तर चर्चा झाली. शहरातील आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या २५ जवानांची तुकडी शहरात दाखल झाली असून विविध ठिकाणी मदतकार्य करण्यासाठी त्यांना पाचारण करण्यात येत आहे.

# पुण्यात विक्रमी पाऊस, 24 तासांत 114.1 मिमी

## 17 वर्षांनी जुलैमधील सर्वोच्च पाऊस, शहराच्या इतिहासातील जुलैच्या एकाच दिवशी झालेला तिसरा सर्वाधिक मोठा पाऊस ठरला

**पुणे | प्रतिनिधी**

शहरासोबतच धरण परिसरातही जोरदार पाऊस झाल्याने गुरुवारी पहाटे तीन वाजता खडकवासला धरणातून मुठा नदीपात्रात पाणी सोडण्यास सुरुवात झाली. त्यामुळे बालेवाडी पूल, मुळा नदीवरील पूल, संगम रस्त्यावरील पूल, होळकर पूल, संगमवाडी पूल, हडपसर-मुंढवा रस्त्यावरील पूल, येरवडा शांतीनगर इथलं पूल, निंबजनगर इथलं पूल पाण्याखाली गेलं. तसंच अनेक सोसायटींमध्ये पाणी शिरल्याच्या घटना घडल्या. सिंहगड रस्ता परिसराला याचा सर्वाधिक फटका बसला. सोसायट्यांच्या आवारात, नदीपात्राजवळच्या बैठ्या घरात पाणी शिरलं होतं. हजारो नागरिकांना याचा फटका बसला होता. लष्कर आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (NDRF) तुकडीला पाचारण करावं लागलं होतं. पुरात अडकलेल्या नागरिकांचं बोटींच्या सहाय्याने जवळच्या शाळांमध्ये स्थलांतर करण्यात आलं होतं. गुरुवारी संध्याकाळपर्यंत एकूण 4 हजार 175 नागरिकांचं स्थलांतर करण्यात आलं होतं. या सर्व नागरिकांच्या भोजनाची सोय महापालिकेकडून करण्यात आली होती. शहराबरोबरच जिल्ह्याच्या ग्रामीण भागाचीही पावसाने दैना केली होती. दरडी कोसळणं, दरडींमुळे घाट रस्ते बंद पडणं अशा घटना घडल्या.

यंत्रणा सक्षम नसल्या की अख्ख्या शहराची कशी वाट लागते, हे सामान्य पुणेकरांनी गुरूवारी अनुभवलं. विकास प्रकल्प हे सर्वसामान्य माणसासाठी केले जात असल्याचा आव आणला जातो. पण निसर्गाला ओरबाडून त्याच्याच उरावर उभ्या राहत असलेल्या विकास प्रकल्पांमुळे सामान्य माणसाचं जगणं जिकिरीचं झालं आहे. बुधवारी पावसाने संततधार स्वरूपात हजेरी लावली होती. हवामान विभागाचा ऑरेंज अलर्ट असल्याने एवढ्या पावसाचा अंदाज नव्हता. त्यामुळे बुधवारी दुपारी खडकवासला धरणातून विसर्ग वाढविण्यात आला होता. पण जसजसा पावसाने दुपारनंतर जोर धरला, तसतशी नदीकाठच्या हाऊसिंग सोसायटीतील रहिवाशांच्या मनात धडकी भरू लागली. शहरातील सिमेंटचे रस्ते, बुजवलेले किंवा वळवलेले नैसर्गिक प्रवाह, अतिक्रमणं, धरणातून पाणी सोडण्याबाबत समन्वयाचा अभाव, सांडपाणी वाहिन्यांची कामं पूर्ण केल्याचा पालिकेचा खोटा दावा, हवामान विभागाचे सतत चुकणारे इशारे यांमुळे गुरुवारी सर्वसामान्य पुणेकरांना ज्या परिस्थितींना सामोरं जावं लागलं, त्यांची उत्तरं मागायची तरी कुणाकडे? गुरुवारी संध्याकाळपासून पावसाचा जोर ओसरला असला तरी सर्वसामान्य 'स्मार्ट सिटी'करांच्या मनात प्रश्नांचा पाऊस कायम आहे.



### प्रश्नांचा पाऊस कायम

» अनुभवलेल्या आणि पाहिलेल्या परिस्थितीनंतर पुणेकरांच्या मनात संपूर्ण व्यवस्थेविषयी अनेक प्रश्न उमटून गेले. नदीच्या पात्रात बांधकामांना परवानगी कशी मिळते? पुरेषा निश्चित असेल, तर नदी केवळ पात्रातून वाहिली, तरी पूर कसा येतो? नाल्यांची सफाई केल्याचे दावे करूनही रस्त्यांवर पाणीच पाणी कसं होतं? पावसाळा पूर्वीची सर्व कामं पूर्ण केल्याची ग्वाही देऊनही रस्ते खड्डेमय कसे होतात? नदीत कचरा टाकणाऱ्यांवर नक्की काय कारवाई होते? दर गुरुवारी तांत्रिक कामं करूनही पाऊस म्हटल्यावर लगेच वीज गायब कशी होते? सिमेंटच्या रस्त्यांमुळे पाण्याचा निचरा होण्यास, ते जमिनीत मुरण्यास अडथळे येत असूनही त्याला पर्यायी मार्गाचा विचार का केला जात नाही? असे आणि यांसारखे असंख्य प्रश्न पुणेकरांच्या मनात उपस्थित झाले. पण या प्रश्नांची उत्तरं मिळणार की नाही, हासुद्धा एक मोठा प्रश्नच आहे.

### हवामान खातेही पाण्यात

» शहरात विक्रमी पावसाची नोंद झाली. जोरदार पावसामुळे शिवाजीनगरमधील हवामान खात्याच्या कार्यालयाबाहेर मोठ्या प्रमाणात पाणी साठले. हवामान विभागाने घाट क्षेत्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला होता. शहरी भागात अधून मधून जोरदार पावसाचा अंदाज होता. मात्र, पावसाने या अंदाजावर पाणी फिरवले शिवाजीनगर, नगर रोड, मंडई भागात मेट्रोचे काम सुरू असल्याने जागोजागी पाणी साठले आहे. त्यामुळे वाहतूक मंदावली आहे. सिमला ऑफिस परिसरातही पाणी तुंबले

### नदीची वहन क्षमता झाली कमी

» 1997 मध्ये 90 हजार क्युसेक या वेगाने पाणी सोडण्यात आल्यानंतर जी पातळी पाण्याने गाठली होती, तीच पातळी 2011 मध्ये 67 हजार 212 क्युसेक वेगाने पाणी सोडल्यावर गाठली गेली. तर 2019 मध्ये 45 हजार 474 क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात आल्यानंतर शहरात हाहाकार उडाला होता. आता 40 हजार क्युसेक पाण्याने पुणे शहराची वाताहात झाली. या उदाहरणांवरून नदीची वहन क्षमता कमी झाल्याचं स्पष्ट होत आहे. त्याचप्रमाणे इतर काही कारणांमुळे नदीपात्र अरुंद होत आहे.

# होतं, नव्हतं ते सगळं पुरात वाहून गेलं, आता चिखल माती गाळ काढतोय!

## पुराच्या पाण्याने उद्ध्वस्त झालेले संसार पुन्हा एकदा सावरतायेत, कष्टकऱ्यांना बसला सर्वाधिक फटका, सोसायट्या, वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरले

**पुणे | प्रतिनिधी**

पुराचं पाणी पहाटेच घरात शिरले. त्या परिस्थितीत अंगावरील कपड्यानीशी, लेकराबाळांना कवेत घेऊन कसाबसा जीव वाचवून घराबाहेर पडलो. भांडी, राशन, कपडे, पोरांची पुस्तके, वह्या सारं काही वाहून गेले. आता भिंत फक्त खचलीच नाही, तर पडायला लागली आहे.

दरवाजा तर पुर्णपणे खराब झाला. सगळ घरदार अक्षरशः गुडगाभर चिखल-मातीने माखलय, आता हे सारं साफ करतोय, पुन्हा उभा राहतोय सरं...! हे शब्द आहेत, घरकाम करणाऱ्या सविता होसमाने यांचे. सविताताईंसारख्या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या हजारो गोरगरीबांचे संसार पुराच्या पाण्यात वाहून गेले, तरीही ते पुन्हा उभा राहतायेत. संसार उभा करताहेत!

खडकवासला धरणातुन पाणी सोडल्याने गुरूवारी सकाळी शहराच्या वेगवेगळ्या भागातील सोसायट्या, वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरले होते. त्याचा सर्वाधिक फटका नागरिकांना बसला. अनेक नागरिकांना जवळील शाळा, समाजमंदीरांमध्ये तात्पुरते स्थलांतरीत करण्यात आले होते.

दरम्यान, गुरूवारी सायंकाळपासून नदीचे पाणी ओसरू लागल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला. त्यानंतर शुक्रवारी सकाळपासूनच नागरिकांचे पाय आपल्या घराकडे वळले. गुडगाभर चिखल, मातीने भरलेल्या घरात कचरा, दुर्गंधीयुक्त पाण्याने संपूर्ण घर भरले होते. भिंती पाण्यामुळे खराब झाल्या होत्या.

घरातील भांडी, धान्य, कपडे, मुलांची शाळेची दफ्तरे, वह्या, पुस्तके पाण्यात वाहून गेले होते. आयुष्यभर पै-पै करून जमविलेल्या एक-एक वस्तु पाण्यासमवेत नदीला मिळाल्या होत्या. त्याही परिस्थितीत नागरिकांनी घरामध्ये स्वच्छता करण्यास सुरूवात केली.

चिखलगाळ काढला, घरे पाण्याने धुवून घेतली. भिजलेली महत्वाची कागदपत्रे, कपडे काही काळ उन्हात वाळण्यास टाकले. भांडी, गॅस, सिलेंडर, कपाट, टिव्ही यांसारख्या वस्तुंचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. खराब झालेल्या वस्तु घराबाहेर काढण्यात नागरिकांचा संपुर्ण दिवस गेला.



### रोजगाराचे "चाक' रुतले !

» पुराच्या पाण्यामुळे वस्त्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या रिक्षा, दुचाकी, चारचाकी वाहने, हातगाड्या पाण्यात गेल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. दैनंदिन काम, रोजगार, व्यवसायांसाठी वाहनांचा वापर केला जातो. मात्र, या वाहनांचे नुकसान झाल्याने अनेक नागरिक अक्षरशः हतबल झाले. वाहने स्वच्छ करूनही उपयोग नसल्याने अनेक कष्टकऱ्यांचे चेहरे चिंताग्रस्त झाले होते.

### मदतीची आता खरी गरज

» पाणी ओसरले आहे. मात्र घरांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ, माती आहे. सकाळपासून घरांची स्वच्छता करण्यास नागरिक प्राधान्य देत आहेत. महापालिकेचे अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून जेवण मिळाले. काही अधिकारी, कर्मचारी पंचनामे करण्यासाठी आले होते.नुकसान भरपाई मिळाल्यास, नागरिकांना आधार मिळेल. घरातील बहुतांश वस्तु पाण्यामुळे खराब झाल्या आहेत. वस्तीमधील बहुतांश नागरिकांचे हातावर पोट आहे. त्यांचे नुकसान झाले आहे. महापालिका, राज्य सरकारकडून मदतीची आता खरी गरज आहे.

# पिंपरी-चिंचवडमधील 15 रस्त्यांवरील वाहतूक बंद!

## मोरया गोसावी मंदिर ते स्मशानभुमी जाणारा रस्ता बंद : पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे पोलिसांचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ परिसर तसेच पिंपरी - चिंचवड शहरात मध्यरात्रीपासून मुसळधार पाऊस कोसळत असल्याने ठिकठिकाणी पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आले. त्यामुळे पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून १५ रस्त्यांवरील वाहतूक बंद केली. स्थिती पूर्ववत होईपर्यंत ही वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे.




आळंदी ते चाकण रोडवरील केळगाव बायपास पूल, चाकण पूल, नगरपरिषद पुलावर पाणी आल्याने या पुलावरून दोन्ही बाजूच्या वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात आला. ही वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. पुण्याकडून येणारी वाहनांनी देहूफाटा चौक डावीकडे वळून मोशी मार्गे इच्छितस्थळी जावे. चर्होली फाटा येथे उजवीकडे वळून पीसीएस चौक, मरकळ चौक, चाकण चौक मार्गे इच्छितस्थळी जावे. चाकणकडून येणारी वाहतूक चाकण चौक - मरकळ चौक - पीसीएस चौकातून उजवीकडे वळून चर्होली फाटा मार्गे इच्छितस्थळी जाईल. तळेगाव तळे भरल्याने तळेगाव गावठाणाकडून सोमाटणे गावाकडे जाणारा रस्ता बंद केला असून, नागरिकांनी लिंब फाटा - तळेगाव खिंड - सोमाटणे फाटामार्गे जावे. तळेगाव दाभाडे येथे हिंदमाता भुयारी मार्गात पाणी भरल्याने सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. त्यासाठी नागरिकांनी काका हलवाई चौक स्टेशन चौक मार्गे जावे. मरकळ ते शिक्रापूर रोडवरील मरकळ पूल वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. नागरिकांनी मरकळ गावात डावीकडे वळून कोयाळी कमानीकडून शेलपिंपळगाव - रसिका हॉटेल मार्गे इच्छितस्थळी जावे. चाकण - म्हाळुंगे पोलीस ठाण्याच्या हद्दीत निघोजे - फलके वस्ती येथील ओढ्यावरून पाणी वाहत असल्याने फलके वस्ती ते मोई गावाकडे जाणारा रस्ता ड्रम लावून वाहतुकीस बंद करण्यात आला आहे.

चाकण येथील चक्रधर रोड ते भुजबळ आळी रस्ता वाहतुकीस बंद आहे. हा रस्ता हा अंतर्गत असल्याने वाहतूक इतर अंतर्गत रस्त्याने वळविण्यात आली आहे. मोई गाव इंद्रायणी नदी पुलावर पाणी आल्याने मोई फाटा ते डायमंड चौक रस्ता वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. ताथवडे येथील भुयारी मार्गात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने या ठिकाणाहून कार तसेच दुचाकींना प्रवेश बंद करण्यात आला असून जड वाहनांकरीता प्रवेश चालू आहे. बिर्ला रुग्णालय ते रिव्हर व्ह्यू चौक वाहतुकीस बंद करण्यात आला असून नागरिकांनी बिर्ला चौकात उजवीकडे वळून बारणे कॉर्नर - तापकीर चौकमार्गे इच्छितस्थळी जावे. रावेत येथे समीर लॉन्स भुयारी मार्गाजवळ सात फुट पाणी साचल्याने हा सेवा रस्ता तसेच समीर लॉन्स भुयारी मार्ग सर्व वाहतुकीस बंद करण्यात आला असून नागरिकांनी मुंबई - बंगळुरू महामार्गाने इच्छितस्थळी जावे.

निगडीतील हेगडेवार पुलाकडून चिंचवड गावाकडे येणारी वाहतूक चित्तराव गणपती येथून येण्या - जाण्यास बंद केली असून नागरिकांनी पिंपरी गाव मार्गे भाटनगर - चिंचवड गावात यावे आणि लिंकरोड भाटनगर मार्गे इच्छितस्थळी जावे. मोरया गोसावी मंदिर ते स्मशानभुमी जाणारा रस्ता बंद करण्यात आला आहे. खराळवाडी समतल विलगकामध्ये पाणी साचल्याने पुणे- मुंबईकडे जाणारा समतल विलगक सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंद करण्यात आला असून नागरिकांनी सेवा रस्त्याने पिंपरी पूल मार्गे मुंबई बाजूने इच्छितस्थळी जावे. तसेच, मोरवाडी चौकातून डावीकडे वळून अजमेरा- नेहरुनगर- वल्लभनगर नाशिक फाटा - मार्गे पुणे बाजूकडे इच्छितस्थळी जावे. पुणे - नाशिक महामार्गावर भोसरी येथे पांजरपोळसमोर पाणी आल्याने पांजरपोळ चौकाकडून भोसरीकडे जाणारी जड अवजड वाहने सोडून इतर वाहनांना वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात आला आहे. भोसरी ते पांजरपोळ चौक सर्व वाहतुकीस बंद करण्यात आलेला आहे. या मार्गावरील वाहने स्पाईनरोड व इंद्रायणीनगर मार्गे ये-जा करतील, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# पोलिसांकडून मदतकार्य सुरू, बचावकार्य जोरात

## आपत्तीत अडकलेल्यांना मदत : समस्या जाणून घेण्यासाठी पोलीस आयुक्तही रस्त्यांवर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसामुळे घरांमध्ये तसेच सोसायट्यांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. तसेच काही ठिकाणचे रस्ते व पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आले. याबाबत पोलिसांकडून सतर्कतेचे आवाहन करण्यात आले तसेच मदत व बचावकार्य करण्यात आले. पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी थेट रस्त्यावर उतरून आढावा घेतला. तसेच नागरिकांशी संवाद साधला.



पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत बहुतांश ठिकाणी सखल भागात पावसाचे पाणी साचले तसेच पवना, इंद्रायणी, मुळा या नद्या दुथडी भरून वाहात आहेत. तसेच नदीपात्रालगतच्या घरांमध्ये पुराचे पाणी शिरले. तर काही रस्ते देखील पाण्याखाली जाऊन रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले. त्यामुळे भर वस्तीमधील अनेक घरांमध्ये पाणी शिरले. यात अडकलेल्या नागरिकांना मदत करण्याबाबत पोलीस आयुक्त चौबे यांनी केली. त्यानुसार स्थानिक पोलीस ठाण्यांसह गुन्हे शाखेच्या पोलिसांनीही मदत करत नागरिकांना दिलासा दिला.

दरम्यान, आयुक्त चौबे यांनी रिव्हर व्ह्यू चौक, चिंचवड गाव, पिंपरी गाव, काळेवाडी पूल, चिखली, भोसरी, भारत माता चौक, एमआयडीसी आदी ठिकाणी पाहणी केली. तसेच पूरस्थितीबाबत माहिती घेऊन आढावा घेतला. पिंपरी येथील संजय गांधीनगर झोपडपट्टी, सुभाषनगर झोपडपट्टी येथे पाणी घुसल्याने तेथील कुटुंबीयांना पिंपरीनगर येथील कमला नेहरू हिंदी प्राथमिक विद्यालयात स्थलांतरित करण्यात आले. तेथे त्यांच्या राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था करण्यात आली. या विद्यालयात भेट देत पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे व पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे यांनी पूरग्रस्त नागरिकांशी संवाद साधून त्यांची विचारपूस केली. तसेच त्यांना आवश्यक मदत उपलब्ध करून देण्याबाबत सूचना केल्या आहेत.

### पवना नदीलगतचे अनेक रस्ते बंद..

**» पवना धरण क्षेत्रात दमदार पावसामुळे पवना नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे पवना नदी शहरातील अनेक भागात पाणी शिरले आहे. पुराचा धोका ओळखून महापालिकेच्या आपत्कालीन टीमने चिंचवड गावात डांगे चौकाकडे जाणाऱ्या बिर्ला हॉस्पिटलसमोरील पूल वाहतुकीसाठी बंद केला आहे. याशिवाय चिंचवडगाव ते काळेवाडी पूल, पिंपळगाव ते काळेवाडी पूल, चिंचवड गावातील मोरया मंदिराशेजारील धनेश्वर पूलही वाहतुकीसाठी बंद केले आहेत. त्यामुळे नागरिकांनी प्रवास करणे टाळावे. पर्यायी मार्गाचा वापर करावा. तसेच महत्वाचे काम असेल तरच घराच्या बाहेर पडावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.**

# पावसाच्या तडाख्यात पुण्याचा विकास गेला वाहून

## शेकडो नागरिकांचे स्थलांतर; बचाव, मदत कार्यात प्रशासन गुंतले : अग्निशमन दलाने केली 254 नागरिकांची सुटका

**पुणे | प्रतिनिधी**

मागील २४ तासांपासून सुरू असलेल्या पावसामुळे पुणे शहराची अक्षरश: दाणादाण उडाली. गुरुवारी (दि. २५) झालेल्या मुसळधार पावसामुळे स्मार्ट सिटी म्हणवणाऱ्या पुण्याच्या विकासाची लक्तरे वेशीवर टांगली गेली.

आपत्कालीन परिस्थितीत अलर्ट देणाऱ्या स्मार्ट यंत्रणेचा बोजवारा उडाल्याचे गुरुवारी पाहायला मिळाले. स्मार्ट सिटीच्या नावाखाली करण्यात आलेला कोट्यवधी रुपयांचा खर्च पाण्यात गेल्याचे चित्र शहरात सर्वत्र दिसून येत होते. ना नागरिकांना धोक्याची सूचना देण्यात आली ना तशी घोषणा करण्यात आली. त्यामुळे लाखो पुणेकरांची त्रेधा उडाली. स्मार्ट सिटीच्या अंतर्गत येणाऱ्या बाणेर, बालेवाडीसह सिंहगड रस्ता, वडगाव शेरी, येरवडा, कल्याणीनगर, कोरेगाव पार्क आदी भागाला पावसाचा मोठा तडाखा बसला.

'स्मार्ट सिटी'चे कार्यालय असलेल्या सिंहगड रस्ता परिसरासह नदीपात्रालगतच्या सखल भागात मोठ्या प्रमाणावर पाणी शिरले. बुधवाररी (दि. २४)



मध्यरात्रीनंतर खडकवासला धरणामधून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आल्यानंतर या भागात पाणी शिरले. स्मार्ट पदपथ-सिमेंटच्या रस्त्यांचा भडीमार, उड्डाणपूल व मेट्रोची सुरू असलेली कामे यामुळे सर्वत्र पूरस्थिती निर्माण झाली.

त्यामुळे मोठ्या प्रमाणावर जनजीवन विस्कळीत झाले. महापालिका, अग्निशामक दल, आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तत्काळ आवश्यक त्या सर्व ठिकाणी मदत पोचविण्यास सुरुवात केली. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिलांसह शेकडो नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले.

नदीपात्रात सुरू असलेल्या नदीसुधार प्रकल्पाचा फटकादेखील शहराला बसला. भरावामुळे पाण्याचा फुगवटा निर्माण झाल्याने पूरसदृश स्थिती निर्माण झाली होती. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या यंत्रणेचा देखील बोजवारा उडाल्याचे पाहायला मिळाले. कोट्यवधी रुपयांच्या निविदा काढून 'टेंडरराज' पोसणाऱ्या यंत्रणांचा विकासाचा दावा गुरुवारी पुराच्या पाण्यात वाहून गेला. दरम्यान, सकाळी मदत व बचाव कार्य सुरू करण्यात आले. स्थानिक लोकप्रतिनिधी, आमदार, नगरसेवक यांच्यासह कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू करण्यात आले.

दरम्यान पुणे शहरात गुरुवारी रात्री उशिरापर्यंत अग्निशमन दलाने सुमारे २५४ नागरिकांची सुखरूप सुटका केली तसेच त्यांना सुरक्षित स्थळी हलविले. बोटी, रस्सी, लाईफ जॅकेट, लाईफ रिंगच्या साहाय्याने हे बचाव कार्य राबविण्यात आले. या बचाव व मदत कार्यात मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे तसेच २० पेक्षा अधिक अग्निशमन अधिकारी आणि सुमारे २०० फायरमन कार्यरत होते.

### या भागाला बसला फटका

खडकवासला धारणामधून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आल्यानंतर पुणे महापालिका हद्दीत बालेवाडी पूल, मुळा नदी पूल, संगम रोड पूल, होळकर ब्रीज, संगमवाडी पूल, महर्षी शिंदे पूल, हडपसर-मुंढवा रोड पूल, मातंग पूल, येरवडा शांतीनगर पूल, निंबजनगर पूल आणि चिखली रस्त्यावरील इंद्रायणी पूल पावसामुळे पाण्याखाली गेले होते.

सिंहगड रस्त्यावरील एकता नगरी, द्वारका सोसायटी, शरदा सरोवर सोसायटी, शाम सुंदर सोसायटी, निंबजनगर परिसरातील सोसायटी, घरकूल सोसायटी, पिंपरी चिंचवड, वृंदावन आश्रम आकुर्डी, विशालनगर, जगताप डेअरी विणस सोसायटी, कुंदननगर या हाउसिंग सोसायट्यांमध्ये पावसाचे पाणी शिरले होते. याठिकाणी तत्काळ मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले होते. निंबजनगर परिसरातील सोसायटी व सिंहगड रोडवरील सोसायट्यांमध्ये पाणी शिरल्याने शेकडो नागरिक घरातच अडकून पडलेले होते. त्यांना खाद्य पदार्थ आणि पाणी इत्यादीची व्यवस्था करण्यात आली आहे.

### ड्रेनेज स्वच्छतेत महापालिकेने यंदाही 'माती खाल्ली'

» खडकवासला धरणसाखळीमध्ये मागील दोन दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असल्याने पाणीसाठा वाढत चालला होता. वरसगाव, पानशेत, टेमघर धारणांमधून पाणी खडकवासला धरणात सोडण्यास सुरुवात झाली होती. त्यानंतर, गुरुवारी पहाटेपासून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. सलग दोन दिवस शहरात पाऊस सुरू असल्याने सर्वत्र पाणी साचून राहिलेले होते. महापालिकेने यंदाही ड्रेनेज स्वच्छता करताना योग्य रितीने काम केले नव्हते. यात पालिकेने 'माती' खाल्लेली असल्याने पावसाळी वाहिन्यांमधून पाण्याचा निचरा होत नव्हता. अनेक ठिकाणी गटारांमधून पाणी उसळ्या मारून बाहेर येत होते. तसेच, रस्त्यांना अक्षरश: नदीचे स्वरूप प्राप्त झाले होते. मेट्रोच्या कामांमुळेदेखील अनेक ठिकाणी पाणी साचले होते.

# पावसामुळे पुणे-मुंबई रेल्वे सेवेला फटका!

## लोहमार्गावर पाणी साचल्याने अनेक गाड्यांना विलंब : अनेक गाड्या रद्द, प्रवाशांचे हाल

**पुणे | प्रतिनिधी**

पावसामुळे पुणे-मुंबई रेल्वे सेवेला गुरूवारी फटका बसला. अनेक गाड्या रद्द करण्यात आल्याने प्रवाशांचे हाल झाले. याचबरोबर अनेक ठिकाणी लोहमार्गावर पाणी साचल्याने अनेक गाड्यांना विलंब झाला. दरम्यान, शुक्रवारी (ता.२६) धावणाऱ्याही काही गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. पुणे-मुंबई दरम्यान धावणाऱ्या तीन गाड्या रेल्वे प्रशासनाने गुरूवारी रद्द केल्या. बदलापूर-वांगणी दरम्यान लोहमार्गावर पाणी साचल्याने या गाड्या रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. यात मुंबई-पुणे डेक्कन क्वीन, मुंबई-पुणे प्रगती एक्स्प्रेस आणि



पुणे-मुंबई इंटरसिटी एक्स्प्रेस या तीन गाड्यांचा समावेश आहे.

हवामान विभागाने जोरदार पावसाचा इशारा दिल्याने शुक्रवारी धावणाऱ्या काही गाड्याही रेल्वे प्रशासनाने रद्द केल्या आहेत. त्यात पुणे-मुंबई डेक्कन क्वीन एक्स्प्रेस, पुणे-मुंबई प्रगती एक्स्प्रेस, मुंबई-पुणे इंटरसिटी एक्स्प्रेस या गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत, अशी माहिती जनसंपर्क अधिकारी रामपाल बडपग्गा यांनी दिली. गाड्या रद्द केल्याने प्रवाशांची ऐनवेळी गैरसोय होऊ नये, यासाठी त्यांना माहिती देण्यासाठी पुणे रेल्वे स्थानकावर मदत कक्ष सुरू करण्यात आला आहे. या कक्षात रेल्वेचे कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. प्रवाशांना पर्यायी गाड्यांची माहिती देण्याची व्यवस्था या कक्षाच्या माध्यमातून केली जात आहे, असे बडपग्गा यांनी सांगितले.

### वाठार-पळशी क्रॉसिंग बंद

» वाठार ते पळशी दरम्यानचे लेव्हल क्रॉसिंग गेट क्रमांक ४७ देखभाल दुरुस्तीसाठी शुक्रवारी बंद राहणार आहे. पुणे विभागाने ओव्हरहॉलिंगच्या देखभालीच्या कामासाठी शुक्रवारपर्यंत गेट बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हे गेट बंद केल्यामुळे रस्त्यावरील वाहतूक वळवण्यात आली आहे. वाठार-पिंपोड-दहिगाव-देऊर, वाठार-दहिगाव- देऊर आणि वाठार-तळीये-बिचकाळे-गुजरवाडी-पळशी अशी वाहतूक वळविण्यात आली आहे.